महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखा अधिकारी संवर्गातील पदोन्नतीचे आदेश रद्द करणेबाबत.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
09 OCT 2026
प्राप्त झाले सही.........................

# महाराष्ट्र शासन
## वित्त विभाग

शासन आदेश क्र.:-संलेको-2026/प्र.क्र.146/E-1796469/कोषा. प्रशा.2,
3 रा मजला (विस्तार), मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-400 032.
दिनांक :- 8 ऑक्टोबर, 2026

**संदर्भ:** 1. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.एसआरव्ही 2015/प्र.क्र.303/का.12, दिनांक 12.09.2016.

2. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.एसआरव्ही-2018/प्र.क्र.159/कार्यासन 12, दिनांक 01.08.2019.

3. वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०२५/प्र.क्र.139/कोषा.प्रशा-2, दिनांक 28.04.2026.

4. संचालनालयाचे पत्र क्र.संलेको/2026/प्रशा राप/का-2/पदोन्नती नाकारणेबाबत/ 1029/827/3902, दिनांक 03.08.2026.

### शासन आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक लेखा अधिकारी, गट-ब (राजपत्रित) संवर्गातील (एस-15: 41800-132300) अधिकाऱ्यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, लेखा अधिकारी (एस-16: 44900-142400) या संवर्गात संदर्भिय दिनांक 28.04.2026 रोजीच्या आदेशान्वये तात्पूरत्या स्वरूपात पदोन्नती देण्यात आली आहे. पदोन्नती देण्यात आलेल्या खालील अधिकाऱ्यांनी पदोन्नती नाकारत असल्याचे त्यांच्या नावासमोर नमूद दिनांकाच्या अर्जान्वये कळविले आहे. त्यानुसार, संदर्भाधिन क्र. 4 येथील पत्रान्वये संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांनी प्रस्तावित केल्यानुसार खालील नमूद अधिकाऱ्यांची लेखा अधिकारी संवर्गातील तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून याद्वारे रद्द करण्यात येत आहे:-

56

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | पदोन्नती नाकारत असल्याबाबत अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| 1 | श्रीमती संस्कृती महेंद्र खरपुडे, सहायक लेखा अधिकारी | दि.01.07.2026 |
| 2 | श्री. संभाजी ज्ञानोबा भोसले, सहायक लेखा अधिकारी | दि.11.05.2026 |
| 3 | श्री. राजेंद्र चंद्रकांत जमदाडे, सहायक लेखा अधिकारी | दि.26.05.2026 |
| 4 | श्रीमती संजीवनी ज. चौधरी, सहायक लेखा अधिकारी | दि.11.05.2026 |
| 5 | श्री. अशोक यमु जाधव, सहायक लेखा अधिकारी | दि.04.05.2026 |

1) पदोन्नती नाकारलेल्या सहायक लेखा अधिकाऱ्यांचे नाव सन 2024-25 च्या निवडसूचीतून वगळण्यात यावे.

2) पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसूचीमध्ये (2025-26 व 2026-27) त्यांच्या नावाचा पदोन्नतीसाठी विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत (2027-28) त्यांची पदोन्नतीसाठीची पात्रता तपासण्यात येईल.

01/9/3/2026/2548
12.10.2026

3) लेखा अधिकारी संवर्गातील सेवाज्येष्ठता ही ते ज्यावेळी पुढील निवडसूचीत (2027-28) पदोन्नतीस पात्र ठरेल व प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदावर रुजू होईल त्या दिनांकापासून विचारात घेण्यात येईल.

4) सदर पदोन्नती नाकारलेल्या सहायक लेखा अधिकाऱ्यांना दिनांक 28.04.2026 रोजीच्या आदेशान्वये पदोन्नती दिलेल्या निवडसूचीतील अधिकाऱ्यांचा व त्यानंतरच्या दोन निवडसूचीतील अधिकाऱ्यांचा मानीव दिनांक प्राप्त होणार नाही.

5) सदर पदोन्नती नाकारलेल्या सहायक लेखा अधिकाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ प्रदान केले असल्यास त्याबाबत वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक 02.03.2019 मधील तरतूदीनुसार सदर लाभ काढून घेण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

2. संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांनी सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by
Avinash Arun Bhasarkar
Date: 08-10-2026
17:36:24

**(अ. अ. भसारकर)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

1. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर. *
2. संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई
3. संचालक, संचालनालय, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई. *
4. संबंधित सहायक लेखा अधिकारी यांचे सध्याचे कार्यालयाचे प्रमुख *
5. संबंधित सहायक लेखा अधिकारी यांची पदोन्नतीने पदस्थापना केलेले कार्यालयाचे प्रमुख *
6. संबंधित अधिकारी *
7. निवडनस्ती कोषा प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

( * संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)